चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०२ जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# घरून निघुन गेलेल्या पाच मुलींचा शोध घेण्यास पोलीसांना यश

## दिल्ली व हैदराबाद येथे जावुन घेतला शोध.

दिनांक २५/०५/२०१९ रोजी पोलीस स्टेशन बल्लारशाह व गडचांदुर येथे दाखल असलेल्या मिंसिंग प्रकरणात एकुण तिन महाविद्यालयीन तरूणी हया घरी कोणाला काही न सांगता निघुन गेल्या होत्या. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन रामनगर येथे दिनांक २८/०४/२०१९ रोजी दाखल मिसिंग प्रकरणातील दोन सख्या बहिणी आम्ही वर्धा येथे जातो असे सांगुण घरून निघुन गेल्या. पोटच्या मुली घरून निघुन गेल्याने मुलींचे आई—वडील चिंतातुर झाले असतांना पोलीसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांनी प्रकरणाकडे विशेष लक्ष देवुन मुलींच्या शोध कामी संबधीत प्रभारी अधिकारी यांना सुचना दिल्या. पोलीस पथकाने मिसिंग प्रकरणातील मुलींचा शोध घेणेकरीता वेगवेगळया मुदद्यांवर तपास करून तसेच तांत्रीक पदध्तीचा वापर करून मिळालेल्या माहिती प्रमाणे बल्लारशाह व गडचांदुर पोलीस स्टेशन येथील तपास पथक हैदराबाद येथे तर पोलीस स्टेशन रामनगर येथील तपास पथक दिल्ली येथे रवाना झाले. तपास पथकाने शोध कार्य गतीमान करीत मुलींचा शोध घेत असतांना दिल्ली येथील तपास पथकास पटपरगंज, दिल्ली या परिसरात पोलीस स्टेशन रामनगर येथील मिसिंग प्रकरणातील दोन सख्या बहिणी यांचा शोध घेण्यास यश आले. तपास पथकाने त्यांना दिल्ली येथे ताब्यात घेवुन स्थानिक पोलीसांच्या मदतीने पुढिल कार्यवाही केली आहे. मिळुन आलेल्या मुलींना विचारपुस करून पुढिल तपास सुरू आहे.

त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन बल्लारशाह व गडचांदुर येथील तपास पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे हैदराबाद येथे जावुन मुलींचा शोध घेण्याकरीता तपास चक्रे गतीमान करीत शोध घेत असतांना गडड्ीयानरम, हैदराबाद या परिसरातील मुलींच्या वस्तीगृहामध्ये मिंसिग प्रकरणातील तिन्ही मुली मिळुन आल्या. त्यांची विचारपुस केली असता, नौकरीच्या शोधात कोणालाही काही एक न सांगता घरून निघुन आलो असल्याचे त्यांनी तपास पथकाला सांगीतले. तपास पथक हैदराबाद येथुन मुलींना ताब्यात घेवुन बल्लारशाह कडे रवाना झाले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, रामनगर प्रभारी पोनि. श्री. हाके, व बल्लारशाह प्रभारी पोनि. श्री. गोतमारे यांचे नेतृत्वात बल्लारशाह येथील सफौ. रमेश बरडे, पोस्टे गडचांदुर पोहवा. पंधरे, मपोशि. मनीषा सोनटक्के, रामनगर पोलीस स्टेशन येथील पोना. संजय चौधरी, पोशि. सुधिर उईके यांनी महत्वाची कामगीरी बजावली आहे.

———————————————————————————————